# लशीमुळे मुलांमध्ये दीर्घकालीन करोनाचा धोका कमी

आरोग्य वार्ता

**पीटीआय, नवी दिल्ली**

सार्स-कोव्ह-२ विषाणूविरोधातील लसीकरणामुळे संसर्गानंतर सातत्याने आरोग्य समस्या उद्भवत असलेल्या दीर्घकालीन करोनाविरोधात मर्यादित संरक्षण पुरविले जात असल्याचे एका अध्ययनातून आढळले आहे. या संदर्भातील निष्कर्ष 'पीडियाट्रिक्स' या नियतकालिकात प्रसिद्ध झाले आहेत.

लहान मुलांपेक्षा दीर्घकालीन कोविड उद्भवण्याचा अधिक धोका असलेल्या किशोरवयीनांमध्ये या लशीचे अधिक प्रबळ प्रभाव असतात, असे हे निष्कर्ष सांगतात. लहान मुलांमध्ये करोनाची एकंदरीत गंभीरता अधिक असते, तर लक्षणे मोठ्या प्रमाणावर बदलू शकत असल्याने आणि या विषाणूची त्यांना नेमक्या कोणत्या कारणांमुळे बाधा होते हे अज्ञात असल्याचे संशोधकांचे म्हणणे आहे.

दम लागणे, आतड्यांच्या कार्यप्रणालीतील बिघाड, वेदना, थकवा आदी लक्षणांचा यात समावेश होतो. तर दाहक प्रतिक्रिया किंवा हृदय समस्या आदी अन्य काही लक्षणे तीव्र असतात, असे संशोधकांनी सांगितले.

या प्रश्नाच्या निराकरणासाठी अद्याप कोणत्याही अध्ययनातून वैद्यकीय माहितीचे, मुलांच्या विविध समूहांचे मोठ्या प्रमाणावर मूल्यमापन केले गेलेले नाही, असे अमेरिकेतील फिलाडेल्फिया येथील चिल्ड्रेन्स हॉस्पिटल (सीएचओपी) मधील या अध्ययनाचे प्रमुख लेखक हॅनी रझाग यांनी सांगितले. या विषाणूचे दुर्मीळ परिणाम आणि त्याचा मुलांवर पडणारा प्रभाव ओळखण्यासाठी आम्हाला विस्तीर्ण आरोग्य सेवा जाळ्यांमधून मिळालेल्या वैद्यकीय माहितीचा उपयोग करून भरपूर प्रमाणात रुग्णांचे पुरेसे नमुने मिळवता आले, असे रझाग यांनी सांगितले. हे अध्ययन दीर्घकालीन करोना प्रतिबंधक लशीचे संरक्षणात्मक परिणाम दर्शविणारी महत्त्वाची माहिती पुरवत असल्याचे या अध्ययनाचे वरिष्ठ लेख व 'सीएचओपी'मधील बालरोगविषयक सहयोगी प्राध्यापक चार्ल्स बेली यांनी सांगितले.







# शेतकऱ्याची आत्महत्या

**लोकसत्ता वार्ताहर**

**नांदेड :** शेतात पेरलेले पीक न उगवल्याने एका ३८ वर्षीय शेतकऱ्याने विषारी द्रव प्राशन करून आत्महत्या केली. ही घटना किनवट तालुक्यातील चिखली तांडा येथे बुधवारी घडली. भीमराव मंगू चव्हाण असे आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्याचे नाव आहे. भीमराव यांनी शेतात रब्बी पिकाची पेरणी केली होती. शेतात पेरलेले पीक उगवलेच नाही. त्यामुळे बँकेचे घेतलेले कर्ज कसे फेडावे, या विवंचनेत होते. बुधवारी ते आपल्या शेतात गेले व विषारी द्रव प्राशन केले.

# सचिनच्या 'डीप फेक' प्रकरणी गुन्हा

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**मुंबई :** माजी क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर यांच्या 'डीप फेक व्हिडिओ'प्रकरणी पश्चिम प्रादेशिक सायबर पोलिसांनी एक फेसबुक वापरकर्ता आणि गेमिंग संकेतस्थळाच्या मालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे. तेंडुलकरचे स्वीय साहाय्यक रमेश पारधे यांनी पोलिसांत तक्रार केली होती.

# पाणी टंचाईचा रब्बी पिकांना फटका?

**दत्ता जाधव, लोकसत्ता**

**पुणे :** अपुऱ्या पावसामुळे राज्यातील बहुतांश धरणे पूर्ण भरली नाहीत. १८ डिसेंबरअखेर राज्यातील धरणांत सरासरी ५७.२२ टक्के पाणीसाठा होता. मागील वर्षी याच दिवशी धरणांतील पाणीसाठा ८२.१६ टक्के होता. राज्य भीषण पाणीटंचाईच्या उंबरठ्यावर उभे आहे. पण, जलसंपदा विभागाचे अधिकारी टंचाई स्थितीवर काहीच बोलण्यास तयार नाहीत. वरिष्ठांचे तसे आदेश असल्याचे सांगितले जात आहे. रब्बी हंगामातील पिकांना फेब्रुवारी महिन्यात तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

राज्यात यंदाच्या पावसाळ्यात पुरेसा पाऊस झाला नाही. त्यामुळे अपवाद वगळता बहुतांश धरणे भरली नाहीत. त्यामुळे रब्बी हंगामातील पिकांना अखेरपर्यंत पाणी पुरण्याची शक्यता कमीच आहे. रब्बी हंगामाला जानेवारी आणि फेब्रुवारी महिन्यात पाण्याची जास्त गरज भासते. हरभरा, करडई आणि ज्वारीवगळता गहू, मका यांसारख्या पिकांना जास्त पाण्याची गरज असते. गहू, मका, ज्वारीसह विविध रब्बी पिके फेब्रुवारी महिन्यात पक्व होण्याच्या अवस्थेत असतात.

## पाणी पिण्यासाठी, की शेतीसाठी?

धरणांत पाणी कमी आहे, याची जाणीव जलसंपदा विभागाचे अधिकारी, राज्य सरकार, शेतकऱ्यांसह शहरी जनतेलाही आहे. पण, चालू वर्ष निवडणुकांचे आहे. त्यामुळे कोणालाही नाराज करायचे नाही, असे सरकारचे धोरण दिसते. धरणांत पाणीसाठा कमी असूनही आजवर रब्बी पिकांना नियमित आवर्तने सोडली जात आहेत. शहरी जनतेलाही विनाकपात पाणीपुरवठा सुरू आहे. धरणांतील सध्याचे पाणी जून २०२४अखेर पुरवावे लागणार आहे. त्यामुळे निवडणुकांचा संदर्भ न लावता पाण्याच्या कठोर नियोजनाची गरज आहे. पण, ना राज्य सरकार, ना जलसंपदा विभाग कठोर नियोजनाच्या मनःस्थितीत आहे. ऐन उन्हाळ्यात शहरी जनतेला भीषण पाणीटंचाईचा सामना करावा लागू शकतो.

## विभागनिहाय पाणीसाठा, कंसात मागील वर्षीची स्थिती (टक्क्यांत)

नागपूर : ६४.७६ (७६.८७)
अमरावती : ६७.०९ (८३.२२)
औरंगाबाद : ३३.५६ (८१.६१)
नाशिक : ६१.४२ (८६.९१)
पुणे : ५८.२९ (८२.६८)
कोकण : ७२.९९ (७९.०१)
महाराष्ट्र : ५७.२२ (८२.१६)

> औरंगाबाद विभागात यंदा कमी पाणीसाठा आहे. फक्त चार धरणांतील पाणीसाठ्याचा उपयोग शेतीसाठी करण्यात येणार आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्देशांनुसार अन्य धरणांतील पाणी पिण्यासाठी राखीव ठेवण्यात आले आहे. उपलब्ध पाण्याचे काटेकोर नियोजन करण्यात आले आहे.
> – सब्बीनवार एस. के, अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग, औरंगाबाद

त्यामुळे शेतकरी पिकांना पाणी देण्यासाठी तारेवरची कसरत करीत असतात. नेमक्या याच काळात यंदा रब्बी पिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागणार आहे. प्रामुख्याने मान्सूनोत्तर पाऊस न झालेल्या ठिकाणी टंचाईची स्थिती अधिक गंभीर असणार आहे.

जलसंपदा विभागाने दिलेल्या माहितीनुसार, १८ जानेवारीअखेर औरंगाबाद विभागात फक्त ३३.५६ टक्के पाणीसाठा आहे.

मागील वर्षी याच दिवशी ८१.६१ टक्के पाणीसाठा होता. त्या खालोखाल पुणे विभागात ५८.२९ टक्के पाणीसाठा आहे. मागील वर्षी याच दिवशी ८२.६८ टक्के पाणीसाठा होता. राज्याचा विचार करता ५७.२२ टक्के पाणीसाठा आहे. मागील वर्षी याच वर्षी ८२.१६ टक्के पाणीसाठा होता. आकडेवारीवरून मागील वर्षीच्या तुलनेत यंदा पाणीसाठा सुमारे २० टक्क्यांनी कमी असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे.


**Public Notice**

ICICI PRUDENTIAL LIFE INSURANCE

## ICICI Prudential Life Insurance Company Limited

**CIN: L66010MH2000PLC127837**

**Registered office:** 1089, Appasaheb Marathe Marg, Prabhadevi, Mumbai - 400025 (Reg. No. 105 dated 24.11.2000)

**Ph**: 022-40391600, **Fax**: 022-24224484, **Email**: ir@iciciprulife.com, **Website**: www.iciciprulife.com

### Consolidated Financial Result

(₹ in lakhs)

| Sr. No | Particulars | Three months ended/at | | Nine months ended/at | | Year ended/at |
|---|---|---|---|---|---|---|
| | | December 31, 2023 (Audited) | December 31, 2022 (Audited) | December 31, 2023 (Audited) | December 31, 2022 (Audited) | March 31, 2023 (Audited) |
| 1 | Premium Income (gross)[1] | 1,028,497 | 978,046 | 2,808,563 | 2,694,076 | 3,993,278 |
| 2 | Net Profit / (Loss) for the period (before tax, Exceptional and / or Extraordinary items) | 23,129 | 22,606 | 68,639 | 58,310 | 90,031 |
| 3 | Net Profit / (Loss) for the period before tax (after Exceptional and / or Extraordinary items) | 23,129 | 22,606 | 68,639 | 58,310 | 90,031 |
| 4 | Net Profit / (Loss) for the period after tax (after Exceptional and / or Extraordinary items) | 22,692 | 22,156 | 67,700 | 57,824 | 81,349 |
| 5 | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit / (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)][2] | NA | NA | NA | NA | NA |
| 6 | Paid up equity share capital | 144,006 | 143,856 | 144,006 | 143,856 | 143,857 |
| 7 | Reserves (excluding revaluation reserve) | 898,516 | 810,130 | 898,516 | 810,130 | 833,691 |
| 8 | Earnings per share (face value of ₹ 10/- each) | | | | | |
| | (a) Basic (not annualised for three/nine months) (in ₹) | 1.58 | 1.54 | 4.70 | 4.02 | 5.66 |
| | (b) Diluted (not annualised for three/nine months) (in ₹) | 1.57 | 1.54 | 4.68 | 4.01 | 5.65 |

**Key numbers of Standalone Audited Financial Results of the Company are as under :** (₹ in lakhs)

| Sr. No | Particulars | Three months ended/at | | Nine months ended/at | | Year ended/at |
|---|---|---|---|---|---|---|
| | | December 31, 2023 (Audited) | December 31, 2022 (Audited) | December 31, 2023 (Audited) | December 31, 2022 (Audited) | March 31, 2023 (Audited) |
| 1 | Premium Income (gross)[1] | 1,028,497 | 978,046 | 2,808,563 | 2,694,076 | 3,993,278 |
| 2 | Profit before tax | 23,210 | 22,492 | 68,889 | 58,009 | 89,690 |
| 3 | Profit after tax | 22,747 | 22,063 | 67,863 | 57,580 | 81,067 |
| 4 | Total Comprehensive income[2] | NA | NA | NA | NA | NA |

[1] Premium income is gross of reinsurance and net of goods & service tax.
[2] The new Indian Accounting Standards (Ind AS) are currently not applicable to Insurance companies in India.

**Additional details based on consolidated financial results as per Regulation 52(4) of SEBI (LODR) 2015** (₹ in lakhs)

| Sr. No | Particulars | Three months ended/at | | Year ended/at |
|---|---|---|---|---|
| | | December 31, 2023 (Audited) | December 31, 2022 (Audited) | March 31, 2023 (Audited) |
| 1 | Total Income from Operations | 1,028,497 | 978,046 | 3,993,278 |
| 2 | Net Profit / (Loss) for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinary items) | 23,129 | 22,606 | 90,031 |
| 3 | Net Profit / (Loss) for the period before tax (after Exceptional and/or Extraordinary items) | 23,129 | 22,606 | 90,031 |
| 4 | Net Profit / (Loss) for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items) | 22,692 | 22,156 | 81,349 |
| 5 | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit/ (Loss) for the period (after tax)and Other Comprehensive Income (after tax)] | NA | NA | NA |
| 6 | Paid up Equity Share Capital | 144,006 | 143,856 | 143,857 |
| 7 | Reserves (excluding Revaluation Reserve) | 898,516 | 810,130 | 833,691 |
| 8 | Securities Premium Account | 358,754 | 352,961 | 352,996 |
| 9 | Net worth (Note 1) | 1,107,122 | 1,008,927 | 1,008,952 |
| 10 | Paid up Debt Capital/ Outstanding Debt | 120,000 | 120,000 | 120,000 |
| 11 | Outstanding Redeemable Preference Shares | NA | NA | NA |
| 12 | Debt Equity Ratio (Note 2) | 0.11 | 0.12 | 0.12 |
| 13 | Earnings Per Share (of ₹ 10/- each) | | | |
| | (a) Basic EPS before and after extraordinary items (net of tax expense) for the period (not annualized for three months) | 1.58 | 1.54 | 5.66 |
| | (b) Diluted EPS before and after extraordinary items (net of tax expense) for the period (not annualized for three months) | 1.57 | 1.54 | 5.65 |
| 14 | Capital Redemption Reserve (Note 3) | NA | NA | NA |
| 15 | Debenture Redemption Reserve (Note 3) | NA | NA | NA |
| 16 | Debt Service Coverage Ratio (DSCR) (not annualized for three months) (Note 4) | 12.19 | 11.91 | 11.96 |
| 17 | Interest Service Coverage Ratio (ISCR) (not annualized for three months) (Note 5) | 12.19 | 11.91 | 11.96 |

**Notes:**

1. Net worth represents shareholder's funds excluding redeemable preference shares, if any.
2. Debt-Equity Ratio is calculated as total borrowings divided by Equity. Equity is calculated as shareholder's funds excluding redeemable preference shares, if any.
3. Capital Redemption Reserve and Debenture redemption reserve is not required to be created as per Companies Act 2013 and Companies (Share Capital & Debenture) Amendment Rules, 2019 dated August 16, 2019 respectively.
4. DSCR is calculated as Profit before interest, depreciation and tax (Shareholders account) divided by interest expenses together with principal payments of long term debt during the period.
5. ISCR is calculated as Profit before interest, depreciation and tax (Shareholders account) divided by interest expenses of long term debt during the period.

**Note:**

a)The above is an extract of the detailed format of quarterly financial results filed with the Stock Exchanges under Regulation 33 & 52(4)of the SEBI (Listing Obligation and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the quarterly financial results are available on the Stock Exchange websites (www.nseindia.com and www.bseindia.com) and the Company's website (www.iciciprulife.com).

b)For the other line items referred in regulation 52 (4) of the LODR Regulations, pertinent disclosures have been made to the National Stock Exchange (NSE) and The BSE Ltd (BSE) and can be accessed on the Company's website (www.iciciprulife.com).

**For and on behalf of Board of Directors**

Mumbai
January 17, 2024

**Anup Bagchi**
**Managing Director & CEO**
DIN: 00105962



TATA

## टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

**नोंदणीकृत कार्यालय:** ११वा मजला, टॉवर 'ए', पेनिन्सुला बिझिनेस पार्क, गणपतराव कदम मार्ग, लोअर परळ, मुंबई – ४०००१३.
**शाखा कार्यालय:** प्लॉट नं. १८३, दुसरा मजला, माझदा टॉवर, युनिट ०३, जीपीओ रोड, त्रिंबक नाका, नाशिक– ४२२००१.

### स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता सूचना

(सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२च्या रुल ९(१) यासह वाचलेल्या रुल ८(६) अंतर्गत)

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२च्या रुल ८(६) व रुल ९(१) च्या तरतुदींसह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई–लिलाव सूचना.**

आम जनतेस आणि विशेषकरून याखालील ऋणको/ सह–ऋणको किंवा विशेषकरून त्यांचे विधि वारसदार/ प्रतिनिधी (ऋणको) यांना याद्वारा सूचना देण्यात येते की, "**टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि.**"कडे ("**टीसीएचएफएल**") गहाण असलेल्या याखाली वर्णिलेल्या स्थावर मालमत्तेचा ताबा "टीसीएचएफएल"च्या प्राधिकृत अधिकारींद्वारा घेण्यात आलेला आहे, सदर स्थावर मालमत्तेची विक्री याखाली नमूद केलेल्या ऋणको व सह–ऋणकोंकडील थकित देणींच्या वसूलीकरिता "जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे काही आहे" व "जे काही आहे तेथे आहे" आणि "कोणत्याही आधाराशिवाय" या तत्त्वावर **२१.०२.२०२४** रोजी करण्यात येणार आहे. राखीव किंमत व इसारा रक्कम ठेव खाली नमूद केली आहे. याद्वारा सूचना देण्यात येते की, विक्रीची तारीख पुढे ढकलणे/ विक्री खंडित होणे न झाल्यास, उक्त सुरक्षित मत्ता/ मालमत्तेची विक्री उक्त **२१.०२.२०२४** रोजी **दु. ०२.०० वा. ई–लिलावा**द्वारा करण्यात येणार आहे. ई–लिलावात सहभागी होण्याकरिता इरठेचा डिमांड ड्राफ्ट समाविष्ट मोहोरबंद लिफाफा, शाखेचा पत्ता "**टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि.**" प्लॉट नं. १८३, दुसरा मजला, माझदा टॉवर, युनिट ०३, जीपीओ रोड, त्रिंबक नाका, नाशिक-४२२००१ येथे **२०.०२.२०२४** रोजी **सायं. ०५.०० वा. पर्यंत किंवा तत्पूर्वी** "टीसीएचएफएल"च्या प्राधिकृत अधिकारीकडे सादर करण्यात यावा.

सुरक्षित मत्ता/ मालमत्तेची विक्री याखाली दिलेल्या संक्षिप्त तपशीलवार वर्णनानुसार "जसे आहे जेथे ज्या स्थितीत आहे" या तत्त्वावर करण्यात येणार आहे.

| अनु. क्र. | लोन अका. नं. | ऋणको/ सह–ऋणको/ विधि वारसदार/ विधि प्रतिनिधी/ हमीदारांची नावे | मागणी सूचनेनुसार रक्कम | राखीव किंमत | इसारा रक्कम ठेव | ताब्याचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | ९४५५९१५ | श्री. वसंत विश्राम पगारे, श्रीमती तुल्साबाई वसंत पगारे | रु. ९,६२,६७३/–<br>१२.०२.२०२० | रु. १७,६४,०००/– (रुपये सतरा लाख चौसष्ट हजार फक्त) | रु. १,७६,४००/– (रुपये एक लाख शहात्तर हजार चारशे फक्त) | प्रत्यक्ष |
| | **स्थावर मालमत्तेचे वर्णन**: पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे- सर्व्हे नं. २३९/२/ए + बी + सी – १ – १ – १ + २ / ए / बी+सी/ ४, त्यापैकी प्लॉट नं. ०४, त्यावरील फ्लॅट नं. १३, मोजमापाचा एरिआ ५८.५५ चौ.मी., "प्रिती पार्क को–ऑप. हाऊ. सोसायटी लि."मधील दुसऱ्या मजल्यावरील, नाशिक, म्हसरूल, नाशिकच्या मर्यादेत. **पुढीलप्रमाणे सीमित**: **पूर्व**: ओपन स्पेस, **पश्चिम**: फ्लॅट नं. १४, **उत्तर**: फ्लॅट नं. १२, **दक्षिण**: कॉलनी रोड. | | | | | |
| २) | टीसीएचएचएल०६० १०००१०००६५२२६ व टीसीएचआयएन०६० १०००१०००६५९०८ | श्री. आशिषकुमार प्रेम जयस्वाल, श्रीमती पुष्पादेवी प्रेमप्रकाश जयस्वाल, मेसर्स जयस्वाल मार्केटिंग | रु. १६,८०,७६०/– (रुपये सोळा लाख ऐंशी हजार सातशे साठ फक्त) ॲग्रीमेंट नं. टीसीएचएचएल०६०१०००१०० ०६५२२६ अंतर्गत तुमच्याद्वारा देय व देणी आहे आणि रक्कम रु. ५९,५७५/–(रुपये एकोणसाठ हजार पाचशे पंचाहत्तर फक्त) ॲग्रीमेंट नं. टीसीएचआयएन०६०१०००१० ००६५९०८ अंतर्गत तुमच्याद्वारा देय व देणी आहे. एकूण रु. १७,४०,३३५/–(रुपये सतरा लाख चाळीस हजार तिनशे पस्तीस फक्त)<br>१२.०७.२०२२ | रु. २३,७६,०००/– (रुपये तेवीस लाख शहात्तर हजार फक्त) | रु. २,३७,६००/– (रुपये दोन लाख सदतीस हजार सहाशे फक्त) | सांकेतिक |
| | **स्थावर मालमत्तेचे वर्णन**: पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे- सर्व्हे नं. ३०/३/२/१, त्यापैकी प्लॉट नं. १/२/३/४, त्यावरील फ्लॅट नं. एफ-३०२, मोजमापाचा बिल्ट-अप एरिआ ६६.९१ चौ.मी., "श्री अथर्व पार्क"मधील फेज-३ च्या बिल्डिंग नं. "एफ"मधील, मखमलाबाद, नाशिक म्युनिसिपल कॉर्पोरेशनच्या मर्यादेत. **पुढीलप्रमाणे सीमित**: **पूर्व**: फ्लॅट नं. एफ-२०३, **पश्चिम**: फ्लॅट नं.ई-३०३, **उत्तर**: पॅसेज व फ्लॅट नं. एफ-३०१, **दक्षिण**: ओपन स्पेस. | | | | | |
| ३) | १००३००६७ | श्री. समाधान अंबादास धोंगडे, श्रीमती रेश्मा समाधान धोंगडे | रु. १२,४७,७४१/– (रुपये बारा लाख सत्तेचाळीस हजार सातशे एकेचाळीस फक्त)<br>१३.०७.२०२२ | रु. १५,९०,०००/– (रुपये पंधरा लाख नव्वद हजार फक्त) | रु. १,५९,०००/– (रुपये एक लाख एकोणसाठ हजार फक्त) | प्रत्यक्ष |
| | **स्थावर मालमत्तेचे वर्णन**: पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे- सर्व्हे नं. ७६/१, त्यापैकी प्लॉट नं. ३३ व ३४, त्यावरील फ्लॅट नं. ०४, मोजमापाचा एरिआ ४९.२५६ चौ.मी., "साईज्योत अपार्टमेंट"मधील, दुसऱ्या मजल्यावरील, देवलाली, नाशिक म्युनिसिपल कॉर्पोरेशनच्या मर्यादेत. **पुढीलप्रमाणे सीमित**: **पूर्व**: स्टेअरकेस व साइड मार्जिन, **पश्चिम**: साइड स्पेस व ७.५ मी. कॉलनी रोड, **उत्तर**: साइड मार्जिन व प्लॉट नं. ३५, **दक्षिण**: फ्लॅट नं. ०३. | | | | | |
| ४) | १००१४९१० | श्री. नितीन दिलीप अहिरे, श्रीमती वैशाली नितीन अहिरे | रु. १४,९५,९०८/– (रुपये चौदा लाख पंचाण्णव हजार नऊशे आठ फक्त)<br>१४.१०.२०१९ | रु. १९,२१,५००/– (रुपये एकोणीस लाख एकवीस हजार पाचशे फक्त) | रु. १,९२,१५०/– (रुपये एक लाख ब्याण्णव हजार एकशे पन्नास फक्त) | प्रत्यक्ष |
| | **स्थावर मालमत्तेचे वर्णन**: पुढील बिगर–कृषी जमीन मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे- सर्व्हे नं. १७२, त्यापैकी प्लॉट नं. ५४ ते ५६, त्यावरील फ्लॅट नं. ०८, मोजमापाचा बिल्ट–अप एरिआ ५६.६७ चौ.मी., "विजया को–ऑप. हाऊसिंग सोसा. लि.", नाशिक, "ई" टाइपमधील दुसऱ्या मजल्यावरील. **पुढीलप्रमाणे सीमित**: **पूर्व**: बिल्डिंगची ओपन स्पेस व ९ मी. कॉलनी रोड, **पश्चिम**: फ्लॅट नं. ०९, **उत्तर**: फ्लॅट नं. ११ व डक्ट, **दक्षिण**: बिल्डिंगची ओपन स्पेस व प्लॉट नं. ५३. | | | | | |

लिलावाच्या स्थळी आम जनतेस त्यांच्या बोली व्यक्तीशः सादर करण्यास आमंत्रित करण्यात आले आहे. ऋणको/ सह–ऋणकोंना या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून **३० दिवसांच्या** आत पुढील व्याजासह एकूण देणींचे प्रदान करण्यास शेवटची संधी देण्यात येत आहे, त्यास असमर्थ ठरल्यास अनुसूचीनुसार स्थावर मालमत्तेची विक्री करण्यात येईल. जर "प्राधिकृत अधिकारी"कडे व्याज व किमतीसह (विक्रीचा खर्च समाविष्ट) पूर्वोक्त देय रकमेचा भरणा केल्यास किंवा सदर सुरक्षित ऋण, व्याज व खर्च लिलाव तारखेपूर्वी प्रदान केल्याचा पुरावा त्यांच्या समाधानाखातीर "प्राधिकृत अधिकारीं"ना दिला असल्यास ई–लिलाव थांबविण्यात येईल.

कोणताही अधिकारी किंवा कोणतीही व्यक्ती, या विक्रीसंबंधित बोलीकरिता प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कोणतीही भुमिका बजावत असल्यास विक्री, तथापी, विकलेल्या स्थावर मालमत्तेवरील कोणतेही हित संपादन करणे किंवा करण्याचा प्रयत्न करणार नाही.

विक्री सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२ यामधील विहित शर्ती तसेच खालील शर्तींच्या अनुसरणाच्या विषयाधीन राहील:

**नोंद: ई–लिलाव प्रत्येकी १० मिनिटांच्या मर्यादित विस्तारासह २१.०२.२०२४ रोजी दु. ०२.०० व दु.०३.०० दरम्यान http://www.bankauctions.in/ या पोर्टलद्वारा आयोजिला जाईल.**

**शर्ती व अटी**: (१) याखालील अनुसूचीतील विनिर्दिष्ट तपशील निम्नस्वाक्षरीकारांच्या उत्तम माहितीच्या आधारे दिलेला आहे, परंतु निम्नस्वाक्षरीकार या उद्घोषणेतील कोणतीही चूक, असत्कथन किंवा लोपन याकरिता उत्तरदायी नसतील. बोली रक्कम किंवा बोलीदारासंबंधित कोणताही वाद उद्भवल्यास स्थावर मालमत्ता पुन्हा एकदा प्राधिकृत अधिकारींच्या स्वेच्छाधिकाराच्या विषयाधीन लिलावात ठेवण्यात येईल. (३) स्थावर मालमत्ता राखीव किमतीच्या खाली विकली जाणार नाही. (३) बोली वृद्धी रक्कम **रु. १०,०००/– (रुपये दहा हजार फक्त)** असेल. (४) मालमत्तेच्या खरेदीकरिता सादर केलेल्या सर्व बोली "टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि."च्या नावे, देय शाखेच्या पत्त्यावर, डिमांड ड्राफ्टद्वारा वर नमूद केल्यानुसार इसारा रकमेसमवेत असतील. डिमांड ड्राफ्ट्स लिलावानंतर अयशस्वी बोलीदारांना परत केले जातील. एनईएफटी/ आरटीजीएस/आयएमपीएसद्वारा इरठेच्या प्रदानाकरिता, कृपया प्राधिकृत अधिकारींशी संपर्क साधावा. (५) उच्चतर बोलीदारास यशस्वी बोलीदार म्हणून घोषित करण्यात येईल, मात्र असे की तो/ ती बोलीकरिता कायद्याने अर्हताप्राप्त असावा/ असावी आणि याअधिक असे की बोली रक्कम राखीव किमतीच्या कमी नसावी. उच्चतर बोलीची स्वीकृती किंवा नाकारणे "प्राधिकृत अधिकारी"च्या स्वेच्छाधिकारावर राहील, जेव्हा दिलेली किंमत स्पष्टपणे त्यांना अपुरी वाटल्यास त्यांना तसे करणे भाग पडल्यास. (६) अभिलिखित कारणे देऊन विक्री स्थगित करण्याचा/ खंडित करण्याचा स्वेच्छाधिकार "प्राधिकृत अधिकारीं"चा राहील. (७) स्थावर मालमत्तेची पाहणी **१२.०२.२०२४ रोजी स. ११.०० व सायं. ०५.००** दरम्यान भेटीची पूर्व–वेळ ठरवून करता येईल. (८) यशस्वी बोलीदार म्हणून घोषित झालेली व्यक्ती, सदर घोषणेनंतर त्वरित खरेदी रक्कम/ बोली रकमेच्या पंचवीस टक्के ठेव जमा करील, ज्यामध्ये २४ तासांच्या आत "प्राधिकृत अधिकारी"कडे जमा करावयाची इरठे रक्कम समाविष्ट असेल आणि सदर ठेव जमा करण्यास कसूर झाल्यास मालमत्ता पुढे खासगीरीत्या नवीन लिलाव/ विक्रिकरिता ठेवण्यात येईल. (९) जर वरीलनुसार प्रारंभिक ठेव जमा केल्यास, देय खरेदी रकमेची उर्वरित रक्कम मालमत्तेच्या विक्रीच्या निश्चित तारखेपासून १५ दिवसांच्या आत किंवा तत्पूर्वी, सदर दिवस वगळता किंवा १५वा दिवस रविवार किंवा अन्य सुटीचा दिवस असल्यास १५व्या दिवसानंतर येणाऱ्या पहिल्या कार्यालयीन दिवशी "प्राधिकृत अधिकारी"कडे खरीददाराद्वारा प्रदान करावयाची आहे. (१०) वर नमूद केलेल्या कालावधीच्या आत कोणत्याही प्रदानास कसूर झाल्यास मालमत्ता खासगीरीत्या नवीन लिलाव/ विक्रीकरिता ठेवण्यात येईल. इरठे समाविष्ट ठेव "टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि."द्वारा जप्त करण्यात येईल आणि कसूर करणारा खरीददार मालमत्तेवरील सर्व दावे गमावेल. (११) कोणत्याही भाराचा सविस्तर तपशील, "टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि."ला ज्ञात असलेला, ज्याकरिता मालमत्ता पात्र आहे: वरील तक्त्यानुसार. स्वारस्य असलेल्या बोलीदारांना सल्ला देण्यात येतो की, त्यांनी मालमत्ता करावरील सांविधिक थकित दायित्वे, विद्युत देय इ. समाविष्ट मालमत्तेवरील भारासंबंधित स्वतः स्वतंत्र चौकशी करावी. (१२) कोणत्याही अन्य तपशीलाकरिता किंवा ई–लिलावावरील ऑनलाइन प्रशिक्षण प्रक्रिया याकरिता भावी बोलीदार संपर्क साधू शकतील: सेवा–पुरवठाकार– **मेसर्स ४क्लोजर**, ब्लॉक नं. ६०५ ए, ६वा मजला, मैत्रिवणम कमर्शियल कॉम्प्लेक्स, अमीरपेट, हैद्राबाद–५०००३८, तिच्या समन्वयकाद्वारा **श्री. अरिजित कुमार दास**, ८१४२०००७२५, ८१४२००००६६, ८१४२००००६२, ईमेल: arijit@bankauctions.in व ईमेल: info@bankauctions.in किंवा **मनिष बंसल**, **ईमेल**: **manish.bansal@tatacapital.com "प्राधिकृत अधिकारी" मोबाइल नं.**: **८५८८९८३६९६**. कृपया तुमच्या शंका वॉट्सॲप नंबर– ९९९९०७८६६९ यावर पाठवाव्यात. (१३) उच्चतर घोषित केलेल्या बोली रकमेवरील उच्चतर बोलीदाराद्वारा १%ची टीडीएस लागू व देय असणार आहे. रक्कम मालक/ ऋणकोच्या पॅनमध्ये उच्चतर बोलीदाराद्वारा भरणे आवश्यक असणार आहे आणि चलनाची प्रत आमच्या कंपनीकडे सादर करण्यात यावी. (१४) कृपया वरील तपशीलाकरिता **http://surl.li/oxksn** या सुरक्षित धनकोच्या वेबसाइटवर तरतूद केलेली लिंक पाहावी. (१५) कृपया या लिंकवरसुद्धा भेट द्यावी: **https://www.tatacapital.com/property-disposal.html**

**कृपया नोंद घ्यावी**– "टीसीएचएफएल"ने या मालमत्तेच्या विक्री/ लिलावाकरिता नमूद केलेले ऑक्शनिंग पार्टनर वगळता कोणत्याही दलाल/ एजन्टची नियुक्ती केलेली नाही. स्वारस्य असलेल्या पक्षकारांनी या प्रकरणासंबंधित सर्व शंका व चौकशी याकरिता केवळ निम्नस्वाक्षरीकार किंवा प्राधिकृत अधिकारींशी संपर्क साधावा.

**स्थळ**: नाशिक
**तारीख**: १९.०१.२०२४

**स्वाक्षरी/–**
**प्राधिकृत अधिकारी**
**टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि.**